

# मुंबई विद्यापीठ

डॉ. अजय प्र. देशमुख
एम.ए., पीएच.डी.
कुलसचिव

REG/ICC/2019-20/25

**परिपत्रक :**

**विषय- राज्यात कोरोना विषाणू (कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत**

संदर्भ १) सार्वजनिक आरोग्य विभाग, पत्र क्र. करोना–२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य –५, दिनांक १४/०३/२०२०

२) सार्वजनिक आरोग्य विभाग, पत्र क्र. करोना–२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य –५, दिनांक १५/०३/२०२०

३) संक्रीर्ण –२०२० प्र.क्र. ६०/२०/तांशि–१, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई, दिनांक १६/०३/२०२०

४) शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण) पुणे पत्र क्र. उशिसं/कोरोना/मवि–१/२०२०/३८१९ दिनांक १६/०३/२०२०

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी संदर्भाधिन पत्रानुसार कोरोना विषाणूचा (कोव्हिड–१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७, दि. १३/०३/२०२० पासून लागू करुन खंड–२,३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे. अधिसुचनेतील उपाययोजनेचा भाग म्हणून उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व सर्व नगरपंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी/अनुदानिक/खाजगी शैक्षणिक संस्था/महाविद्यालये/अकृषी विद्यापीठे दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत सुचना निर्गमित केल्या आहेत. तथापी विद्यापीठांनी प्रात्यक्षिके व परीक्षा विहित वेळापत्रकानुसार घेण्यात याव्यात असाही निर्णय घेण्यात आला होता. तसेच आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाही यासाठी आवश्यक ती दक्षता व खबरदारी घेण्याच्या सूचना देखिल देण्यात आल्या आहेत.

उपरोक्त संदर्भांकिंत पत्र क्र. २, ३ व ४ चे अनुषंगाने तंत्र शिक्षण/उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व अकृषी विद्यापीठे/तंत्रशास्त्र विद्यापीठे/सर्व स्वयं अर्थसहाय्यित, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित/मॉडेल डिग्री महाविद्यालये/तंत्रनिकेतन/अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये/वसतिगृहे व परिसंस्था तसेच कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शैक्षणिक संस्था/वसतीगृहे दिनांक ३१/०३/२०२० पर्यंत बंद राहतील.

या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये, विद्यापीठ उपपरिसरे, आदर्श महाविद्यालये, मान्यता प्राप्त संस्था व विद्यापीठ शैक्षणिक विभागा अंतर्गत दिनांक ३१.०३.२०२० पर्यंत होणा–या प्रात्यक्षिक व लेखी परिक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. सदर परिक्षांचे सुधारित वेळापत्रका संदर्भात शासनाच्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

महात्मा गांधी मार्ग, फोर्ट परीसर, मुंबई ४०० ०३२. दुरध्वनी : ९१-२२-६८३२ ०००७.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, विद्यानगरी, सांताक्रुझ, मुंबई ४०० ०९८.
ईमेल.: registrar@fort.mu.ac.in वेबसाईट.: www.mu.ac.in

Scanned with CamScanner

# मुंबई विद्यापीठ

डॉ. अजय प्र. देशमुख
एम.ए., पीएच.डी.
कुलसचिव




मुंबई विद्यापीठाशी संलग्नित सर्व अनुदानित/विना अनुदानित महाविद्यालये/आदर्श महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्थांमधील सर्व अध्यापक दिनांक २५/०३/२०२० पर्यंत घरी राहून (work from home) कामकाज करु शकतील.

तथापी, आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास प्रशासकीय कारणास्तव कुलगुरू / प्र कुलगुरू / कुलसचिव / उपकुलसचिव तसेच संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य/संचालक/अधिष्ठाता यांनी निर्देश दिल्यास त्यानुसार अध्यापकांना संस्थेमध्ये तातडीने हजर राहणे बंधनकारक राहील.

विद्यापीठाचे कुलगुरू / प्र कुलगुरू / कुलसचिव /संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ/ वित्त व लेखा अधिकारी/संचालक, ज्ञान स्त्रोत केंद्र/इतर संवैधानिक अधिकारी/संचालक, उपपरिसर/उपकुलसचिव तसेच महाविद्यालयांचे प्राचार्य / संचालक / अधिष्ठाता व शिक्षकेत्तर कर्मचारी नियमितरित्या कार्यालयामध्ये उपस्थित राहतील.

उपरोक्त उपाययोजनां संदर्भात आवश्यकतेनुसार पुढील कार्यवाहीच्या सुचना वेळोवेळी निर्गमित करण्यात येतील. काही अडचणी असल्यास कृपया खालील दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

१. परीक्षा विभाग ०२२– २६५३२०५२/५३/२६५३२०३५
२. प्रशासकीय विभाग ०२२– २२७०२३४४/६८३२०००६

मुंबई
१६ मार्च, २०२०

(डॉ. अजय देशमुख)
कुलसचिव

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी-**

सर्व संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य/ संस्थाप्रमुख, मान्यताप्राप्त संस्थाचे प्रमुख



Scanned with CamScanner